एस. सी.सी. क्र. ६८४/२०१८

शासन – वि – विजय आडे

नि.क्र. **२५**

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ३ ची साक्ष शपथेवर सुरु

गुलाब संगडाजी चव्हाण

वयः ६२ वर्षे धंदाः मजुरी

रा. वसंतनगर, ता. केळापुर जि. यवतमाळ

**सर तपासणी सरकारी वकील ए.के. शाह यांचे मार्फतः–**

मी आरोपी विजय याला ओळखतो कारण तो माझ्या गावातील रहीवासी आहे. पोलिसांनी मला कोणतेही सुचनापत्र दिले नव्हते. पोलिसांनी माझ्या समक्ष कोणताही पंचनामा केला नाही. आता मला दिनांक ०६/०५/२०१८ रोजीचा चे सुचनापत्र दाखवीण्यात आले, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर मला माहित नाही, त्यास सहीपुरता **नि. क्र. २६** देण्यात आला. आता मला दिनांक ०६/०५/२०१८ घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर मला माहित नाही, त्यास सहीपुरता **नि.क्र. २७** देण्यात आला.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने विदयमान सरकारी अभियोक्तांनी सदर साक्षीदार फितूर घोषीत करण्याची परवानगी मागीतली. साक्षीदारास फितूर घोषीत करण्यात येते व उलट तपासणीची परवानगी देण्यात येते.**

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६/०५/२०१८ रोजी पोलिसांनी मला फिर्यादी मंगला हिच्या घरासमोर मौजा वसंतनग येथे पंचनाम्याकरीता बोलवीले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या ठिकाणी आरोपी फिर्यादीकडे पाहुन डोळा मारत होता व मान हालवुन चालण्यासाठी सांगितल होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी सदरचा घटनेचा माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरचा घटनास्थळ पंचनामा वाचुन त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला वाचवीण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपी तर्फे ॲड. ए. बी. किनाके**

नाकारली

फेर तपास काही नाही

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

२रे न्यायदंडधिकारी प्रथम श्रेणी
केळापूर
दिनांकः १३/०१/२०२०

माझे समक्ष

(जी. ओ. वानखडे)
२रे न्यायदंडधिकारी प्रथम श्रेणी
केळापूर
दिनांकः १३/०१/२०२०